Maratha Vidya Prasarak Samaj's

S.V.K.T. Arts, Science & Commerce College, Deolali Camp, Nashik

# Arts Circle

## Year 2020-21



दै. संचार, सोलापूर दि. २५/०९/२०२० **संमिश्र**

# साभिनय काव्यनाट्य स्पर्धेत 'दोन मिनिटे' प्रथम

**शहर संचार**

**सोलापूर, दि. २४-** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, उपनगरीय शाखा व कवी दत्ता हलसगीकर स्मृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय साभिनय काव्यनाट्य स्पर्धेत पुणे येथील रुद्रक्षम थिएटरच्या 'दोन मिनिटे' या काव्य नाटकास प्रथम पारितोषिक जाहीर झाले आहे.

सोलापूरच्या श्रुती मंदिर संस्थेच्या कदर (द्वितीय) तर अक्कलकोट येथील सीबी खेडगी महाविद्यालयाच्या जगणं वसाडलेलं या काव्य नाट्यास (तृतीय) पारितोषिक प्राप्त झाले. एम.व्ही.के.टी. महाविद्यालय नाशिक या संस्थेच्या इन्स्पेक्शन अन माय या काव्य नाट्याची उत्तेजनार्थ परस्कारासाठी निवड झाली आहे.

**स्पर्धेतील अन्य निकाल पुढीलप्रमाणे :**

**दिग्दर्शन खुला गट :** काजल आटकळे, गणेश मरोड (दोन मिनिटे, प्रथम), विद्या काळे (कदर, द्वितीय), सचिन धुमाळ (जगणं ओसाडलेलं, तृतीय), **वैयक्तिक अभिनय (खुला गट)** स्त्री अभिनय : काजल आटकळे, पुरुष अभिनय : बाळू कोळी, शालेय गट : आम्ही समदं ध्यानात ठिवू (दिग्दर्शिका- सारिका केदार, सोलापूर), बाप्पा (दिग्दर्शिका- मधुरा टापरे-अगरकर, पुणे).

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून मंदार काळे, रजनीश जोशी यांनी काम पाहिले. स्पर्धा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे स्पर्धा कार्यवाह संदीप जाधव व मीरा शेंडगे यांनी परिश्रम घेतले.

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा मराठी रंगभूमी दिनी ५ नोव्हेंबर रोजी होणार असून विजेत्या स्पर्धक संघांना याबाबत माहिती दिली जाईल, अशी माहिती परिषदेचे अध्यक्ष विजय साळुंखे यांनी दिली.

**State Level Poetic Act Competition**





**State Level Skit Competition**









लोकमत

# एकांकिकांच्या सादरीकरणाची रंगत

■ लोकमत न्यूज नेटवर्क

नाशिक : नाशिकच्या कलाकारांना ओटीटी (ओव्हर द टॉप) प्लॅटफॉर्म प्रदान करणाऱ्या एकांकिका महोत्सवात शनिवारी सहा एकांकिका सादर झाल्यानंतर या महोत्सवाचा समारोप झाला.

पुण्याची गोल्डन शेड अँड कंपनीच्या निर्मितीत नाट्यसेवा प्रस्तुत या महोत्सवात शनिवारी 'चुकीला माफी नाही' हे संदीप पाचंगे लिखित आणि दिग्दर्शित एकांकिका सादर झाली. त्यानंतर ओमकार टिळे लिखित आणि प्रथमेश ओमकार दिग्दर्शित पडद्यामागील स्वर्ग ही एकांकिका सादर झाली. त्याशिवाय पराग घोंगे लिखित आणि हेमंत गव्हाणे दिग्दर्शित 'क्षितीजाच्या पलीकडे', तर रोहित पगारे लिखित दिग्दर्शित 'कोणासाठी केले' ही एकांकिका सादर झाली. त्याशिवाय जयश्री जाधव लिखित आणि दिग्दर्शित 'निशस्त्र', तर वैभव पाटील लिखित आणि हर्षवर्धन खांबेकर दिग्दर्शित 'स्वेटर' ही एकांकिका सादर झाली.

**One Act play for OTT Platform (The Channel One)**